ग्रंथमालिका ‘बालसंस्कार’ : खंड ३

# गुण जोपासा आणि आदर्श व्हा !

मराठी (Marathi)

**संकलक**


**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**


**साहाय्यक**


**श्री. राजेंद्र महादेव पावसकर**

(भूतपूर्व शिक्षक, माध्यमिक विद्यामंदिर, सांताक्रूझ [पू.], मुंबई.)



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २५, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९९ लाख १० सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. 'ईश्वरप्राप्तीसाठी कला' याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. ३.२.२०२५ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २१५ अन् अन्य ९४४ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति' या उपाधीने संबोधले जात आहे.

F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.


---

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

### ग्रंथ वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी पुढील प्रार्थना करा !

हे कुलदेवते (स्वतःच्या कुलदेवतेचे नाव घ्यावे), उपास्यदेवते (स्वतःच्या उपास्यदेवतेचे नाव घ्यावे) आणि गुरुदेवा (गुरु असल्यास), आपल्या कृपेने या ग्रंथातील विषय मला नीट समजू दे अन् त्यानुसार मला योग्य आचरणही करता येऊ दे.



## अनुक्रमणिका

(काही सूत्रांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे पुढे दिले आहेत.)


**१. मुलांनो, गुणी का बनावे ?** १०

१ अ. गुणी आणि आदर्श बालके सर्वांनाच आवडतात ! १०

१ इ. जीवन आनंदी अन् यशस्वी बनण्यासाठी गुण आवश्यक ११

**२. गुण-संवर्धन प्रक्रिया** १२

२ अ. व्याख्या १२

२ आ. 'गुण-संवर्धन प्रक्रिया' कशी राबवावी ? १२

२ आ १. गुणांची निवड करणे १२

२ आ ३. गुण-संवर्धन सारणी (तक्ता) लिहिणे १२

**३. विविध गुण आणि ते वाढवण्यासाठी करावयाचे प्रयत्न** १५

३ अ. व्यावहारिक जीवनात उपयोगी पडणारे काही गुण १५

३ आ. अभ्यास चांगला होण्यासाठी उपयोगी पडणारे काही गुण ३७

३ आ २. एकाग्रता ३ आ ३.पाठांतर ३८

३ इ. नैतिकता वाढण्यासाठी उपयोगी पडणारे काही गुण ४१

३ इ १. खरे बोलणे ३ इ ३. नम्रता ४१

३ ई. साधना चांगली होण्यासाठी उपयोगी पडणारे काही गुण ४९

३ ई २. आज्ञापालन ३ ई ७. तळमळ ५४

३ ई ८. भाव ३ ई ९. त्याग ६३

३ उ. राष्ट्रहितविषयक काही गुण ७४

३ उ १. राष्ट्राभिमान ३ उ २. बलोपासना ७४

३ ऊ. धर्मनिष्ठा वाढण्यासाठी उपयोगी पडणारे काही गुण ८२

३ ऊ १. धर्मप्रेम ३ ऊ २. धर्माचरण ८२

**४. अभ्यासाच्या माध्यमातून गुणांचे संवर्धन कसे होते ? ८८**

४ अ. व्यावहारिक गुण कसे अंगी येतात ? ८८

४ आ. बौद्धिक गुण कसे अंगी येतात ? ८९

४ इ. आध्यात्मिक गुण कसे अंगी येतात ? ८९

**५. विविध गुण अंगी असलेले सनातनचे काही बालसाधक ९१**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ९५**

### पालकांनो, मुला-मुलींवर लहानपणापासूनच सुसंस्कारही करा !

मुलात जन्मतःच स्वभावदोष असू शकतात. एखादे मूल जन्मतःच भित्रे वा स्वार्थी असू शकते, उदा. एखाद्याचे नाव 'रणवीर' असूनही तो भित्रा असू शकतो ! स्वभावदोषांमुळे मुलाची वृत्ती बनत असते. मुलावर सुसंस्कार झाले, तर ते सद्गुणी बनते. याउलट कुसंस्कार झाले, तर दुर्गुणी बनते.

यासाठी केवळ मुला-मुलींची नावे आध्यात्मिक अर्थ असलेली ठेवून भागत नाही, तर त्या नावाप्रमाणे मुलावर संस्कार करणेही आवश्यक असते. मुलाचे नाव 'समर्पण' ठेवले, तरी त्याला राजा शिबी, कर्ण आदी दानविरांच्या कथा सांगणे, स्वतःचा खाऊ दुसऱ्याला देण्यास शिकवणे आदी करावे लागते, तरच मूल त्यागी वृत्तीचे बनते. मुलीचे नाव 'आनंदी' ठेवले, तरी तिला सतत आनंदी रहाता येण्यासाठी नामजप, प्रार्थना आदी साधना करण्यास शिकवणे, हेही तेवढेच आवश्यक असते.

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## मनोगत

आदर्श विद्यार्थ्याचे सर्वजण कौतुक करतात. शाळेत, घरात, तसेच इतरत्र त्याचे कौतुक होते. आपलेही वागणे आदर्श होण्यासाठी आपल्यात सद्‌गुण निर्माण होणे आवश्यक आहे. देवालाही सद्‌गुणी मुले आवडतात; कारण ती स्वतः आनंदी राहून इतरांनाही आनंद देतात.

प्रस्तुत ग्रंथात स्वावलंबन, एकाग्रता, राष्ट्राभिमान, धर्माचरण आदी गुणांच्या जोपासनेसाठी मुलांनी कसे प्रयत्न करावेत, याचे विवेचन केले आहे. दोष घालवून गुण जोपासणाऱ्या सनातनच्या काही बालसाधकांची उदाहरणेही दिली आहेत. ती वाचून इतरांनाही प्रेरणा मिळेल.

‘मुलांमध्ये आंतरिक सुधारणा झाली, तरच खऱ्या अर्थाने त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होतो’, हे सूत्र लक्षात घेऊन ग्रंथात काही आदर्श व्यक्तीमत्त्वे अन् थोर राष्ट्रपुरुष यांच्या जीवनातील प्रसंग दिले आहेत. त्या त्या प्रसंगामुळे मुलांच्या मनावर संबंधित गुणाचे महत्त्व चटकन् बिंबेल. हा ग्रंथ अभ्यासल्याने मुलांमध्ये गुण वाढून त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होवो, तसेच त्यांचे भावी जीवन आनंदी आणि यशस्वी बनो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

### पालकांना नम्र विनंती !

‘गुण-संवर्धन प्रक्रिया’ ही एक मानसिक उपचारपद्धत आहे. या विषयाची मुलांना सवय नसते. बहुतांशी मुलांना एखादी गोष्ट चिकाटीने करण्याचीही सवय नसते. तसेच ही प्रक्रिया राबवतांना मनाशी सतत संघर्ष करावा लागत असल्याने मुलांना ही प्रक्रिया आरंभी कठीणही वाटते. वस्तूतः ही प्रक्रिया कठीण नाही, तर आनंददायी आहे. पालकांनो, तुमचा आधार, तुमचे साहाय्य मुलांमध्ये या प्रक्रियेविषयी आत्मविश्वास निर्माण करण्यात लाखमोलाचे ठरेल, यात शंका नाही.